**<u>नियमीत दिवाणी दावा क्र.८५/२०१५ मधील नि.क्र.१५९ खालील</u>**
**<u>आदेश</u>**
**आदेश पारीत दिनांक १४/०२/२०२६**
**सखुबाई वि. भगवान**
**(CNR NO.MHLA050019602025)**

**०१.** वादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रकिया संहितेचे आदेश ०६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरूस्ती करणे कामी दाखल केलेला आहे.

**०२.** वादीचे अर्जातील कथन असे आहे की, वादी यांनी प्रस्तुत दावा, दावा मिळकत गट क्र.४४१ पैकी ० हेक्टर ८८ आर जमिनीची वाटणी करुन वेगळा ताबा मिळण्याकरीता दाखल केला आहे. वडीलोपार्जित जमीन प्रतिवादी क्र.३ ने बेकायदेशीररीत्या खरेदी केलेली आहे. वाद मिळकतीत वादींचा हिस्सा आहे. वादी पुढे असे कथन करतो की, वाद मिळकतीतील ७४ आर जमीन ही मनार प्रकल्प उपसा सिंचन अंतर्गत संपादीत केलेली आहे. त्यामुळे, प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र.५ म्हणून उपविभागीय कार्यालय, अहमदपूर भूसंपादन यांना दाव्यात समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्यांचा दाव्यात समावेश करावा अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

**०३.** प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दाखल केले. आपले म्हणण्यामध्ये असे कथन केले की, प्रस्तुत दावा दि.०३/०६/२०१५ रोजी दाखल केला आहे. दावा दाखल करताना वाद मिळकत संपादीत झाल्याचे वादी यांना माहिती होते. प्रतिवादी क्र.३ यांनी नि.क्र.२८ वर दि.१७/०७/२०१५ रोजी वादग्रस्त मिळकतीपैकी काही भाग संपादीत झाल्याचे वादीस सूचीत केले असताना १० वर्षानंतर व पुरावा संपल्यानंतर निर्णयाचे स्थितीत असताना सदरचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी वादीचा अर्ज खर्चासह रद्द करावा अशी विनंती करीत आहेत.

**०४.** वादी व प्रतिवादी यांचे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत दाव्यातील विनंतीचे अवलोकन केले असता असे निर्दशणास येते की, वादी यांनी दावा मिळकतीत त्यांचा १/३ हिस्सा असल्याचे व त्याचा त्यांना वेगळा ताबा देण्याची मागणी केलेली आहे. दाव्यात वादी यांची दुसरी मागणी अशी आहे की, दि.१९/११/२००१ रोजीचे खरेदीखत दस्त क्र.१४८२/२००१ रद्दबातल करुन ते वादीचे हिस्स्यावर बंधनकारक नसल्याचे ठरवून मिळावे. वादीचे दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत दावा हा वाटपाकरीता व खरेदीखत दस्त बंधनकारक नसल्याचे ठरवून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

दावा मिळकतीपैकी ७४ आर जमीन मनार उपसा सिंचन योजनेकरीता संपादीत झाल्याचे दोन्ही पक्षकारांना मान्य आहे. प्रस्तुत दाव्यात वादीचा दावा मिळकतीत १/३ हिस्सा आहे किंवा नाही व दि.१९/११/२००१ रोजीचे खरेदीखत वादीवर बंधनकारक आहे किंवा नाही हे प्रमुख मुद्दे आहेत. दावा मिळकतीतील काही भाग शासनाने संपादीत केला असला तरी त्याचा या दाव्याचा गुण-दोषावर निकाल करण्यात कोणताही अडथळा येणार नाही. प्रस्तुत प्रकरणात शासन हे सहहिस्सेधारक नाही. त्यांचेविरुध्द कोणतीही मागणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे, उपविभागीय अधिकारी, भूसंपादन विभाग यांचेशिवाय दाव्याचा निकाल करण्यात कोणतीही बाधा नाही. त्यामुळे, वादीचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. म्हणुन, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

वादीचा दुरूस्ती अर्ज नामंजुर करण्यात येतो.

Digitally signed by WABALE RAMDAS DAULAT
Date: 2026.02.14 13:18:38 +0530

**(आर.डी. वाबळे)**

दिनांक: १४/०२/२०२६

सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर.
अहमदपूर.